वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

अ.क्र.	तपशील		सविस्तर माहिती
१	पीक/वाणाचे नाव		रब्बी ज्वारी : एस.पी.व्ही. १४११ (परभणी मोती)
२	प्रसारीत केल्याचे वर्ष		२००२
३	प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ		वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४	जमीन		मध्यम ते भारी जमीन व पाण्याचा निचरा होणारी
५	हवामान		समशीतोष्ण व कोरडे
६	पेरणी/लागवडीचा कालावधी		१ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबरपर्यंत
७	प्रती एकर बियाणे		४ किलो / एकर
८	पीक व्यवस्थापन		
	१	लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन	**पेरणीचा कालावधी :** मराठवाडा विभागामध्ये खोडमाशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ऑक्टोबर महिन्यात पहिला पंधरवाडा (१ ते १५ ऑक्टोबर) हा कालावधी सर्वात चांगला असून या काळात पेरणी केल्यास उत्पादनात वाढ होते. **बीजप्रक्रिया:** काणी रोगाच्या प्रतीबंधासाठी पेरणीपुर्वी बियाण्यास ३०० मेश पोताच्या गंधकाची ४ ग्रॅम किंवा थायरस ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे या प्रमाणात प्रक्रिया करावी. **बियाणाचे प्रमाण :** सुधारीत वाणांचे हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे. **ओलावा साठवणुक :** पेरणीपुर्वी १५ दिवस अगोदर बळीराम नांगराने दोन ओळीतील अंतर ४५ सेमी ठेवुन स-या काढाव्यात आणि स-यामध्ये परतीचा पाऊस झाल्याबरोबर तिफणीच्या सहाय्याने पेरणी करावी. सोयाबीन पिकाच्या लवकर येणा-या वाणानंतर ज्वारीचे पीक घ्यावयाचे असल्यास कमीत कमी (शुन्य) मशागत करुन ज्वारीची पेरणी करणे फायदेशीर ठरते. **आंतरमशागत :** पीक ४० ते ५० दिवसाचे होईपर्यंत किमान ३ कोळपण्या कराव्यात त्यामुळे तणांचा प्रादुर्भाव कमी होऊन जमीन भुसभुशीत राहते आणि ओलावा साठवण्यास मदत होते.
	२	खत व्यवस्थापन	**रासायनिक खतांचा वापर :** पेरणीपुर्वी ८ दिवस किंवा पेरणी करतांना कोरडवाहुसाठी हेक्टरी ४० किलो नत्र अधिक २० किलो स्फुरद हि मात्रा तर ओलितासाठी ८० किलो नत्र + ४० किलो स्फुरद + ४० किलो पालाश हि मात्रा १२ सें.मि. खोल पेरुन दिल्यास उत्पादनात ३० ते ३५ टक्के वाढ होते.
	३	पाणी व्यवस्थापन	**पाणी व्यवस्थापन:** रब्बी ज्वारीला ३०-४० सेंमी पाण्याची गरज असते. ओलीताखालील ज्वारीला सिंचनाच्या उपलब्धतेनुसार पिकांच्या संवेदनशील अवस्थेमध्ये पाण्याच्या पाळया सारा पध्दतीने द्याव्यात.

उपलब्ध पाण्याच्या पाळयानुसार खालील प्रमाणे नियोजन करावे.

पाण्याच्या उपलब्ध पाळया	संवेदनशील अवस्था	पेरणीपासुन लागणारा कालावधी (दिवस)
१	पीक पोटरीत येण्यापुर्वी	३०-४५
२	पोटरी अवस्था फुलोरा	४०-४५ ६०-६५
३	रोपावस्था पोटरी फुलोरा	२५-३० ४०-४५ ६०-६५
४	रोपावस्था पोटरी फुलोरा दाणे भरण्याचा काळ	२५-३० ४०-४५ ६०-६५ ४५-९०

४ कीड व्यवस्थापन

खोडमाशी

निंबोळी अर्क ५ टक्केची फवारणी करावी. किंवा

क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही, २० मिली / १० लीटर पाणी किंवा

ऑक्सीडेमेटॉन मीथाइल २५ टक्के प्रवाही,२० मिली / १० लीटर पाणी

मावा (चिकटा) : खालीलपैकी एका कीटकनाशकाची दिलेल्या माञेप्रमाणे १० लीटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी.

डायमेथोएट ३० टक्के प्रवाही, १० मि. ली.

इमीडॅक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही, ३ मि. ली.

५ रोग व्यवस्थापन

काणी /काजळी : हा रोग प्रामुख्याने रब्बी हंगामात येतो.

रोग व्यवस्थापन : या रोगाचा बंदोबस्त करण्यासाठी शेतातील रोगट झाडे दिसताच काळजीपुर्वक काढुन घ्यावीत व प्लॉस्टीक पिशवीत गोळा करावी. काळी पावडर जमिनीवर पडणार नाही याची काळजी घ्यावी. ही जमा केलेली रोगट कणसे शेताबाहेर जाळुन नष्ट करावी. पिकांची फेरपालट करावी. बियाण्याची कार्बेन्डिझम + थायरम (व्हिटाव्हॅक्स) २.५ ग्रॅम/प्रती किलो किंवा गंधकाची ४ ग्रॅम प्रती किलो बियाण्यासोबत बीजप्रक्रिया करावी.

खडखडया रोगः

१. पिकाची फेर पालट करावी म्हणजेच दरवर्षी त्याच जमिनीवर रब्बीचे पीक घेऊ नये.

२. हलक्या जमिनीवर कोरडवाहु पध्दतीने पेरणी करतांना खडखडया रोगास प्रतीकारक्षम जातीचा वापर करावा.

३. पीक फुलोरा अवस्थेत असतांना शक्य असल्यास पाण्याची एक पाळी द्यावी.

४. खताची योग्य मात्रा देऊन सुध्दा या रोगाचा प्रादुर्भाव ब-याच प्रमाणात कमी करता येतो.

५. रब्बी ज्वारीची पेरणी करताना जैविक बुरशीनाशकाची १० ग्रॅम /

		किलो बियाण्यास बीज प्रक्रिया करावी.
९	**पिकाचा कालावधी**	११८-१२२ दिवस
१०	**उत्पादकता**	धान्य १८-२० क्विंटल / हेक्टर (कोरडवाहू) ३५-३८ क्विंटल / हेक्टर (बागायती) कडबा ६५-७० क्विंटल / हेक्टर
११	**वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म**	१. दाण्याचा रंग पांढरा शुभ्र चमकदार, टपोरा दाणा २. भाकरीची व कडब्याची प्रत चांगली ३. दाण्याचा आकार टपोरा असल्यामुळे अधिक बाजारभाव
१२	**वाणासंबंधीचे छायाचित्रे**	